MHTH170002542026

<u>**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८/२०२६ मधील नि.१ वर आदेश**</u>

<u>**(प्रदिप चिंतामण धानवा विरुध्द निरंक)**</u>

१. सदर अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे हेअरशिप सर्टीफीकेट (वारस प्रमाणपत्र) मिळण्यासाठी करण्यात आला आहे. अर्जदार यांचे कथन असे की, अर्जदार यांची पत्नी प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा ही दिनांक ०८/०९/२०२४ रोजी विरार, ता. वसई, जि. पालघर येथे मयत झाले. त्यांचे कायमचे वास्तव्याचे ठिकाणी धानवीपाडा, दुर्वेस, मनोर, ता.जि. पालघर हे होते. मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांना अर्जदार यांच्याशिवाय अन्य कोणतेही वारस नाही. अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामकाजासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. सबब, मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांचे वारस म्हणून अर्जदार यांना वारस दाखला देण्याची विनंती केली आहे.

२. मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या सिविल मॅन्युअल चॅप्टर १९ पॅ. ३३७ प्रमाणे वारस दाखल्याच्या बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ मधील अर्जाबद्दल ज्युडिशिअल इन्क्वायरी करणे अपेक्षित आहे. तसेच फक्त हेअरशिप सर्टीफिकेटमार्फत मयताच्या मिळकतीत कोणताही मालकी हक्क उद्घोषीत होत नाही असा कायदा आहे.

३. सदर अर्जाबद्दल वर्तमानपत्रात जाहीर नोटीस काढुन व जाहीरनामा उद्घोषित करुन, अर्जाबद्दल आक्षेप असल्यास कोर्टात हजर करण्याचा हुकूम पारित करण्यात आला. तसेच मयत यांच्या हिंदु वारसा कायदयाप्रमाणे वारसांबद्दल माहिती देण्यास अर्जदार यांस निर्देश देण्यात आला. त्याप्रमाणे ''पुण्य नगरी'' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २२/०१/२०२६ जाहीर नोटीस (नि.०९) काढण्यात आली. नि.क्र.५ सोबत असलेला जाहिरनामा बेलिफ रिपोर्ट (नि.क्र.६ सोबत) प्रमाणे दिनांक २७/०१/२०२६ रोजी जाहीरनामा बजावण्यात आलेला आहे. असे असूनही अद्याप कोर्टासमक्ष, सदर अर्जास कोणतेही आक्षेप सादर नाही.

४. न्यायालयासमोर असलेल्या सदरच्या अर्जास अर्जदार प्रदिप चिंतामण धानवा यांचे अर्जास पृष्ठार्थ प्रतिज्ञापत्र (नि.१/अ) कडे दाखल आहे. मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांचा मृत्यु दाखला (नि. ३/१ कडे) दाखल आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा ह्या दिनांक ०८/०९/२०२४ रोजी विरार पूर्व, ता. वसई, जि. पालघर येथे

मयत झाले होते. तसेच, अर्जदार व मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांच्या विवाह प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत (नि. ८/२ कडे), अर्जदार यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत (नि. ३/३ कडे) व मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांच्या यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत (नि. ३/४ कडे) दाखल आहे.

५. अर्जास पृष्ठार्थ प्रतिज्ञापत्र अर्जदार प्रदिप चिंतामण धानवा यांनी (नि.१/अ कडे) सादर केले आहे. अर्जदार यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.१० कडे) व साक्षीदार अमृत मधुकर पारधी यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.११ कडे) दाखल केले आहे. आज रोजी मयताच्या नावाबद्दल नि.क्र.१२ कडे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. नि.क्र.१४ कडे मयताच्या नावाबद्दलचे शपथपत्र ग्रामपंचायत कार्यालय दुर्वेस–साये यांचे. तसेच नि.क्र.८/२ लग्नाच्या प्रमाणपत्रात मयताचे लग्नापूर्वीचे व लग्नानंतरचे नाव नमूद आहे. निशाणी क्र.१५ कडे पुरावा बंद करण्याची पुरसिस दाखल आहे.

६. पुराव्याचे प्रतिज्ञपत्रांचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक ०८/०९/२०२४ रोजी प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा हे विरार, ता. वसई, जि. पालघर येथे मयत झाले. मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा हे हिंदू वैवाहित स्त्री असल्याने, त्यांच्या मरणोत्तर त्यांची मरणसमयी जिवीत असलेले पती व मुले हे हिंदू कायदयाप्रमाणे त्यांचे वारसदार ग्राह्य धरले जातात. म्हणून सादर केलेला पुरावा पाहता, जिवीत पती या नात्याने सदर अर्जामार्फत अर्जदार हे प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांचे वारस असल्याबद्दलचा पुरावा दिला असल्याने ते मयत यांचे कायदेशीर वारस दिसून येत आहेत. सबब,

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ प्रमाणे अर्जदार हे मयत प्रनिशा परेश नागे उर्फ प्रनिशा प्रदिप धानवा यांचे वारस असल्याबद्दलचा दाखला/ हेअरशिप सर्टीफीकेट देण्यात यावे.

३. याद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे की, निव्वळ या दाखल्यामार्फत अर्जदार यांना मयताच्या कोणत्याही मिळकतीत मालकी हक्क मिळणार नाही.

४. संदर्भित कायदेशीर शुल्क अर्जदार यांनी अदा करणे.

५. अर्ज या प्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Digitally signed by PALLAVI SURYAKANT GOURI CHALKAR
Date: 2026.04.23 15:26:02 +0530

दिनांक : २३/०४/२०२६. (श्रीमती. पी. एस. जी. चाळकर)

ठिकाण : पालघर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पालघर

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Suraj S.Saddiwal<br>(Stenographer Grade-III) |
| Court | --- | 2nd Jt.CJJD & JMFC, Palghar |
| Date | --- | 23.04.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 23.04.2026 |
| Order uploaded on | --- | 23.04.2026 |